Literacy for a Billion

Movie: Sakhha bhau pakka vairi
Year: 2008

Song: Aanandacha sohala ha
Lyricist: Jagdish Khebudkar

आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
असा कसा ऊर आज
भरूनिया आला
असा कसा ऊर आज
भरूनिया आला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला

किती रडशील बाळे
आवर हा हुंदका
लाडका हा जीव झाला
माहेरला पोरका
घरट्याची छाया नाही
मुक्या पाखराला
घरट्याची छाया नाही
मुक्या पाखराला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला

नको काढू आठवणी
दुःख मागे राहीले
पाठवणी करताना
जड होती पाऊले
आसू पुसूनिया झाला
पदर हा ओला
आसू पुसूनिया झाला
पदर हा ओला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला

सारे विसरूनी जाई
सासरी सुखाने
मने जिंकूनिया सारी
बोल कौतुकाने
निरोप हा द्यावा आता
कोणी कुणाला
निरोप हा द्यावा आता
कोणी कुणाला

आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
असा कसा ऊर आज
भरूनिया आला
असा कसा ऊर आज
भरूनिया आला

आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा

आसवात न्हाला
आनंदाचा सोहळा हा
आसवात न्हाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*